॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

**Fax : (02462) 215572**

**Phone: (02462) 215325**

## Public Relations Office (PRO)

**जनसंपर्क कार्यालय**

**website: srtmun.ac.in**

**E-mail: pro@srtmun.ac.in**

संदर्भ क्र.: ज.का./२०२४-२५/ २२४ दि.२९/११/२०२४

## मा. कुलगुरू महोदयांची परीक्षा केंद्रास अचानक भेटी



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. मधील द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष व अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या परीक्षा दि. २६ नोव्हेंबर पासून चालू झालेल्या आहेत. दि. २६ नोव्हेंबर रोजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी काही परीक्षा केंद्रावर अचानक भेटी दिल्या आणि तेथील सोयी-सुविधेबद्दल नाराजी व्यक्त केली. व त्याबरोबरच उपस्थित कर्मचाऱ्यांना तुमच्या महाविद्यालयाचे संलग्निकरण का रद्द करण्यात येऊ नये? अशी तंबी दिली.

दि. २६ नोव्हेंबर पासून विद्यापीठाशी संलग्नित सर्वच महाविद्यालयामध्ये प्रात्यक्षिक व लेखी परीक्षा चालू आहेत. यातील काही महाविद्यालयातील परीक्षा केंद्रांना मा. कुलगुरू महोदयांनी भेट दिली. तेव्हा त्यांना अनियमितता आणि सोयी- सुविधांचा अभाव आढळला. यावर त्यांनी अतिशय नाराजी व्यक्त केली.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमानुसार परीक्षा केंद्र घेणाऱ्या प्रत्येक महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान सर्व सोयी- सुविधा उपलब्ध करून देण्यात यावे असे आहे. परंतु कुलगुरू महोदयांच्या भेटीदरम्यान याबाबत अनियमितता दिसून आली.

यापुढे कोणत्याही संलग्नित महाविद्यालयांच्या परीक्षा केंद्रावर अनियमितता अथवा विद्यार्थ्यांची गैरसोय आढळून आल्यास अशा महाविद्यालयावर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी दिला.

---